# विनायक गणेश वझे महाविद्यालय, मुलुंड पूर्व,

मुंबई ४०००८१

दिनांक: ०७ नोव्हेंबर २०१७

## 'ग्रंथोत्सव २०१७' - विद्यार्थ्यांसाठी सूचना

जिल्हा ग्रंथालय अधिकारी, मुंबई उपनगर, मुलुंड यांच्या मार्फत **'ग्रंथोत्सव २०१७'** चे आयोजन दिनांक **१४ व १५ नोव्हेंबर २०१७** रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत मुलुंड पश्चिम येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम सर्व वाचक व ग्रंथ प्रेमींसाठी विनामुल्य खुला आहे.

**ग्रंथोत्सव** २०१७ या कार्यक्रमात **काव्यवाचन, निबंध, लेख, वक्तृत्व**, इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे. कार्यक्रम व स्पर्धांची माहिती सोबत जोडली आहे. स्पर्धांचे अर्ज आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात **ग्रंथपाल / सहाय्यक ग्रंथपाल** यांच्याकडे उपलब्ध आहेत.

**पूर्ण भरलेले अर्ज शुक्रवार दिनांक १० नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत सहाय्यक ग्रंथपाल श्री. शिरसाट यांच्या कडे जमा करावेत.** अर्जासोबत लेख, निबंध, कविता जोडणे आवश्यक आहे.

V. G. VAZE COLLEGE OF ARTS, SCI. & COMM. KELS ★ MULUND
LIBRARY

07/11/17
ग्रंथपाल
वझे महाविद्यालय

➡ *सोबत जोडलेली स्पर्धांची माहिती, नियम तसेच कार्यक्रम पत्रिका पहावी.*

# ग्रंथोत्सव २०१७

## स्पर्धेची माहिती

| काव्य वाचन, वक्तृत्व, निबंध, लेख इत्यादी साहित्यकृतींच्या स्पर्धेचे विषय | |
|---|---|
| १) | माझे आवडते पुस्तक. |
| २) | ग्रंथाने मला काय दिले ? |
| ३) | मोबाईल, संगणक, इंटरनेटच्या युगात ग्रंथांचे महत्व. |

- काव्यवाचन व वक्तृत्वासाठी १० मिनिटांचा कालावधी राहील.
- लेख व निबंधाची मर्यादा ५०० शब्दांपर्यंत राहील.

वरील माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर,मुलुंड,सर फिरोजशहा मेहता ग्रंथालय इमारत, म.न.पा.शाळा संकुल, पी.के.रोड,मुलुंड (पश्चिम), मुंबई- ४०००८०. फोन नं.०२२-२५६४६९०८.या कार्यालयात पाठविण्याची अंतिम मूदत दिनांक १०/११/२०१७ व वेळ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत राहिल.

# ♦ जाहीर निमंत्रण ♦

## ग्रंथोत्सव २०१७

ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या वाचन संस्कृतीमध्ये वाढ व्हावी या हेतूने राज्य शासनातर्फे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ उपलब्ध व्हावेत, तसेच प्रकाशक व ग्रंथ विक्रेते यांना ग्रंथविक्री व प्रसार यासाठी एकाच ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात हा ग्रंथोत्सव साजरा करण्याचा मूख्य उद्देश आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी, मुंबई उपनगर, मुलुंड यांच्या मार्फत **ग्रंथोत्सव २०१७** चे आयोजन **दिनांक-१४ व १५नोव्हेंबर २०१७** रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत दोन दिवस मुलुंड येथे आयोजित करण्यात येत आहे.सदर कार्यक्रम सर्व वाचक, ग्रंथप्रेमी, साहित्यिक व जनतेसाठी विनामुल्य खुला आहे.

या कार्यक्रमात कवीता वाचन तसेच १) माझे आवडते पुस्तक. २) ग्रंथाने मला काय दिले ? ३) मोबाईल, संगणक व इंटरनेटच्या युगात ग्रंथांचे महत्व. या विषयांवर निबंध,लेख व वत्कृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.कविता वाचन व वत्कृत्व स्पर्धेसाठी नावे स्विकारण्याची ; तसेच लेख व निबंध स्विकारण्याची अंतिम दिनांक १०/ ११/ २०१७ व वेळ सायंकाळी ४ वाजे पर्यंत राहील.

वरील कार्यक्रमातील स्पर्धकांनी त्वरित या कार्यालयाशी संपर्क साधावा.
*संपर्कासाठी फोन व मोबाईल क्र.*- 022-25646908 / 8779374807 / 9869442238 / 9922447260.

### कार्यक्रमाचे स्वरूप

**पहीला दिवस-**

| | |
|---|---|
| सकाळचे सत्र | ग्रंथदिंडी, कार्यक्रमाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन व मा.जिल्हाधिकारी यांचे हस्ते शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांस ग्रंथ संच वाटप. |
| दुपारचे सत्र | सर्व बालकांसाठी जाहीर विशेष कार्यक्रम- बाल झुंबड व स्पर्धा |

**दुसरा दिवस-**

| | |
|---|---|
| सकाळचे सत्र | युवा वर्गासाठी " विविध स्पर्धापरिक्षा व कौशल्य विकास " या विषयावर मान्यवरांचे मार्गदर्शन .तसेच वाचक,लेखक, शिक्षक व साहित्यिक यांच्यात परिसंवाद. |
| दुपारचे सत्र | " प्रभावी वाचन माध्यमे " या विषयावर चर्चा व परिसंवाद.तसेच मान्यवरांच्या हस्ते स्पर्धकांना बक्षीस वाटप व समारोपाचा कार्यक्रम. |

सदर कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी .

**सर्व वाचक,अभ्यासक,ग्रंथालयीन कर्मचारी व साहित्यप्रेमींनी ग्रंथोत्सव २०१७ या कार्यक्रमास उपस्थित राहावे.**

Ingole

जिल्हा ग्रंथालय अधिकारी
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय
मुंबई उपनगर, मुलुंड.